दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ४१ ✻ जालना ✻ ✻ शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# मराठा समाजाच्या मागण्याबाबत शासन सकारात्मक, उपोषण मागे घेण्याचे आवाहन

**✻ प्राप्त अर्जांपैकी ९९.९ टक्के अर्ज मंजूर; ✻ महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन ✻ अंतरवाली सराटीच्या विकासावर लक्ष देणार**



जालना/प्रतिनिधी : कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीत जालना जिल्ह्यात एकूण ५ हजार २७ नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे जिल्ह्यात प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर करून जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. मंजूर अर्जांचे प्रमाण ९९.९ टक्के आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्य शासनाने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या १५ मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतले आहेत. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मराठा-कुणबी समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासन व जिल्हा प्रशासनाने मागील तीन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी यावेळी दिली. सामाजिक सलोखा कायम राखण्यावर भर महाराष्ट्र हे प्रगतिशील, आधुनिक आणि विकासाभिमुख राज्य आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी मतभेद टाळून शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करावे. मानवता ही प्रत्येकाची पहिली ओळख असली पाहिजे. जिल्ह्यातील तीन लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश देणारी दैनंदिन प्रार्थना करत आहेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सांगितले. श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या आरोग्याची तपासणी आणि उपचारांसाठी वैद्यकीय पथक चोवीस तास कार्यरत आहे. त्यांची प्रकृती डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहे. शासनाने विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले असून, उर्वरित प्रकरणांवर कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही सुरू आहे. प्रत्येक प्रशासकीय कार्यवाही निर्धारित कायदेशीर प्रक्रियेतच पूर्ण करावी लागते. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी केले. श्रीमती मित्तल म्हणाल्या की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. जिल्ह्यात अवैध मद्यविक्रीविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून, नऊ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. परिसरातील मद्यबंदी पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार आहे. अंतरवाली सराटी गावातील शाळा, अंगणवाडी आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. कुणबी जात प्रमाणपत्रासंदर्भातील नागरिकांच्या अडचणी आणि तक्रारी सोडविण्यासाठी उपजिल्हाधिकारी शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात ०२४८२-२२३१३२ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांना या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले. विद्यार्थी व युवकांसाठी शासनाचे विविध निर्णय शासनाने ७ सप्टेंबर रोजी मराठा-कुणबी समाजातील विद्यार्थी आणि युवकांच्या हितासाठी विविध निर्णय घेतले आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी राज्यस्तरावर २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परदेशी शिष्यवृत्तीअंतर्गत शिक्षण शुल्क थेट संबंधित विदेशी विद्यापीठांना अदा करण्यात येणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच १ ऑक्टोबरपासून मराठा-कुणबी समाजातील १ हजार ४४० युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणातून एक हजारांपेक्षा अधिक युवकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरे**

पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये आवश्यक पुराव्यांसह कागदपत्रे सादर करून पात्र नागरिकांनी अर्ज करावा, असे आवाहन श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले. आज दि. १० सप्टेंबर रोजी जालना जिल्हयातील देवमुर्ती,सावंगी तलाव (जालना), बदनापूर,(बदनापूर) , अंबड (अंबड) , कुंभार पिपळगाव , राणी उंचेगाव (घनसावंगी), आष्टी, (परतूर) ,पांगरी गोसावी (मंठा), आन्वा, दानापूर, पिंपळगाव रेणूकाई (भोकरदन) ,माहोरा(जाफ्राबाद) अशा एकुण १२ महसूल मंडळात शिबीर आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर शिबीरात आतापर्यंत २२ अर्ज प्राप्त झाल्याबाबत प्राथमिक माहिती असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पात्र नागरिकांनी उपलब्ध नोंदी तपासून आवश्यक पुरावे आणि कागदपत्रांसह विशेष शिबिरांमध्ये अथवा संबंधित तहसील कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

### एसईबीसी आरक्षणांतर्गत ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रे

जालना जिल्ह्यात मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणानुसार वर्ष २०२४ ते २०२६ या कालावधीत एकूण ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये २०२४ मध्ये १० हजार ३५, २०२५ मध्ये १६ हजार १८० आणि २०२६ मध्ये ९ हजार ७६६ प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तालुकानिहाय जालना येथे ५ हजार १७५, बदनापूर ३ हजार २०, भोकरदन ७ हजार ७५, जाफ्राबाद ३ हजार ५४१, परतूर ५ हजार ३००, मंठा ३ हजार ४००, अंबड ४ हजार ६४८ आणि घनसावंगी तालुक्यात ३ हजार ८२२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

### अर्ज नामंजूर होण्याचे प्रमाण नगण्य

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीनंतर प्राप्त नोंदीच्या आधारे प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर केले असून उर्वरित १९ अर्जांमध्ये इतर जिल्ह्यांतील पुरावे असल्याने ते नामंजूर करण्यात आले. अर्ज नामंजूर होण्याचे प्रमाण केवळ ०.१ टक्का आहे. सध्या जिल्ह्यात जात प्रमाणपत्र वितरणासाठी एकही अर्ज प्रलंबित नाही. तालुकानिहाय मंजूर अर्जांमध्ये जालना तालुक्यात १ हजार ३४०, बदनापूर १ हजार ४३६, अंबड ३ हजार १८५, घनसावंगी ५४०, भोकरदन ६ हजार ३१८, जाफ्राबाद ९९४, परतूर २ हजार ४१८ आणि मंठा तालुक्यात २ हजार ४५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

### हैदराबाद गॅझेटिअरनुसार ३७७ प्रमाणपत्रांचे वितरण

**दि. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे जिल्ह्यात एकूण ४२१ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३७७ अर्ज मंजूर करून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले, तर ४४ अर्ज नामंजूर करण्यात आले. या प्रक्रियेतील एकही अर्ज सध्या प्रलंबित नाही. समितीच्या तपासणीत आढळलेल्या सर्व नोंदी आणि नोंदींची यादी जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवरही संबंधित याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.**

### जात पडताळणीची १ हजार १६ प्रकरणे वैध

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे एकूण १ हजार ६६४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १ हजार १६ प्रकरणे वैध ठरविण्यात आली आहेत. २३ प्रकरणे अवैध ठरली असून, आवश्यक पुरावे व त्रुटींची पूर्तता न केल्याने १३३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. सध्या ४९२ अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ४७३ अर्ज ९० दिवसांच्या आतील, तर १९ अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीतील आहेत.प्रलंबित प्रकरणांचा नियमानुसार लवकरात लवकर निपटारा करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**

## दुष्काळाचे सावट तरीही आंबा येथे बैलपोळा उत्साहात ; सर्जा-राजाला सजवून शेतकऱ्यांनी केली मनोभावे पूजा; आता वरुण राजाच्या कृपेकडे बळीराजाचे डोळे



आंबा (ता. परतूर), प्रतिनिधी : एकीकडे शिवारावर दुष्काळाचे सावट, पावसाअभावी संकटात आलेली पिके आणि दुसरीकडे वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या सर्जा-राजाप्रती असलेले प्रेम व कृतज्ञता अशा वातावरणात परतूर तालुक्यातील आंबा येथे सालाबादप्रमाणे यंदाही पारंपरिक बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. दुष्काळाची चिंता चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असतानाही शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांना सजवून मनोभावे पूजा केली. सध्या पावसाने ओढ दिल्याने शेतकरी राजा मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाअभावी खरीप पिकांच्या उत्पादनाबाबत चिंता वाढली असून, यंदाच्या बैलपोळा सणावरही दुष्काळी परिस्थितीचा परिणाम दिसून आला. मात्र परिस्थिती कितीही कठीण असली तरी कृषी संस्कृतीची परंपरा जपण्याचा निर्धार आंबा येथील शेतकऱ्यांनी कायम ठेवला. पोळ्यानिमित्त सकाळपासूनच गावात उत्साहाचे वातावरण होते. शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाला स्वच्छ धुऊन शिंगांना रंगरंगोटी केली. आकर्षक झूल, गोंडे, फुले आणि विविध सजावटीच्या साहित्याने बैलांना सजविण्यात आले. त्यानंतर विधिवत पूजा करून वर्षभर शेतीच्या कामात मोलाची साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. गावातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आल्याने पोळ्याच्या उत्सवाला पारंपरिक स्वरूप प्राप्त झाले. उत्सवात आनंद; मनात मात्र पावसाची चिंता बैलपोळ्याचा उत्साह असला तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दुष्काळाची चिंता स्पष्टपणे जाणवत होती. (पान ३ वर)

## दुष्काळाच्या सावटात तळणीत 'पोळा' उत्साहात; पाटलांच्या मानाच्या बैलांचे पूजन, १ हजार बैलांची उपस्थिती!



तळणी । प्रतिनिधी

येथे दुष्काळाचे सावट गडद होत असतानाही बैलपोळा सण अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला. संपूर्ण मंठा तालुक्यात तळणी येथील पोळा सणाची मोठी परंपरा असून तो दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गेल्या दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्याने बळीराजा चिंतेत आहे, अशाही परिस्थितीत शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाचा हा सण साजरा करत महादेवाला चांगल्या पावसासाठी साकडे घातले. मानाचे पूजन आणि पारंपरिक 'लग्न' सोहळा तळणी येथील पोळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे प्रथेप्रमाणे सर्वप्रथम पाटलांच्या मानाच्या बैलांची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत बैलांचे पारंपरिक पद्धतीने 'लग्न' लावून देण्यात आले आणि त्यानंतरच पोळा फुटला. यंदाच्या पोळ्यात परिसरातील जवळपास १ हजार बैलांची मोठी उपस्थिती (पान ३ वर)

## मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्जाची मुदत



जालना/प्रतिनिधी : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधने उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मिनी ट्रॅक्टर योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधने खरेदीसाठी कमाल ३ लाख ५० हजार रुपये किमतीपर्यंत ९० टक्के शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. यामध्ये कमाल ३ लाख १५ हजार रुपयांचे अनुदान अनुज्ञेय असून, उर्वरित १० टक्के रक्कम म्हणजेच ३५ हजार रुपये लाभार्थी बचत गटाचा स्वहिस्सा राहणार आहे.

पात्र बचत गटांनी https://samajkalyanjalna.com या संकेतस्थळावर जाऊन प्रथम नोंदणी करावी. नोंदणीनंतर प्राप्त लॉगिनद्वारे ऑनलाइन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे झऊ्रऋ स्वरूपात अपलोड करावीत. ऑनलाइन अर्ज पूर्णपणे भरून अंतिमरित्या सादर केल्यानंतर अर्जाची प्रिंट अथवा मूळ प्रत तसेच ऑनलाइन अर्जासोबत अपलोड केलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या प्रती ३०सप्टेंबर २०२६ पर्यंतसंबंधित कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज सादर करून त्याची प्रत व कागदपत्रे कार्यालयात जमा न करणाऱ्या अर्जांचा छाननीच्या वेळी विचार केला जाणार नाही, (पान ३ वर)



दुष्काळाचे सावट, असतांना आणि पावसाअभावी संकटात आलेली पिके तरीही शेतीच्या कामात साथ देणाऱ्या सर्जा-राजाप्रती असलेले प्रेम बैलाचे पुजन करून पोळा सण उत्साहात साजरा करतांना दै. चकमकचे संपादक शामसुंदर चितोडा दिसत आहे.

## बीआरएसपी च्या जालना जिल्हाध्यक्ष पदी कैलास रत्नपारखे

### जिल्हा प्रभारीपदी काशिनाथ मगरे, युवा जिल्हाध्यक्षपदी राहुल गंगातिवरे; नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप



जालना, प्रतिनिधी : बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी (BRSP) च्या जालना जिल्हाध्यक्षपदी कैलास ईश्वरशेठ रत्नपारखे यांची निवड करण्यात आली. तर जालना जिल्हा प्रभारीपदी काशिनाथ दादा मगरे आणि युवा जिल्हाध्यक्षपदी राहुल गंगातिवरे यांची नियुक्ती करण्यात आली. पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन संघटनात्मक जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. जालना येथील अंबड चौफुली परिसरातील ४८८ विश्रामगृहात बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासह आगामी काळातील संघटनात्मक वाटचालीच्या दृष्टीने बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत जालना जिल्हा प्रभारीपदी काशिनाथ दादा मगरे, जिल्हाध्यक्षपदी कैलास ईश्वरशेठ रत्नपारखे, युवा जिल्हाध्यक्षपदी राहुल गंगातिवरे, जालना तालुकाध्यक्षपदी आनंद गाडेकर, युवा जालना तालुकाध्यक्षपदी मिलिंद जोगदंड, तर युवा जालना शहराध्यक्षपदी सचिन लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन (पान ३ वर)

# संपादकीय

## खुली मैदानी राखली गेली पाहीजे

निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे ही आता नैसर्गिक नव्हे, तर मानवनिर्मित आपत्ती बनली आहे. पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते. कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही. यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत. डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढील युद्धे पाण्यासाठीच होतील. या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला युद्धपातळीवर काही पावले उचलावी लागतील. शहरांमधील ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषेवरील सर्व बांधकामे तात्काळ पाडावी लागतील. 'स्पंज सिटी' ही संकल्पना राबवून शहरांमध्ये पाणी शोषून घेणारी उद्याने आणि खुली मैदाने राखली पाहिजेत.

# मुंबई गुदमरतेय...



सात बेटांचे शहर असलेली मायानगरी मुंबई ही केवळ देशाची आर्थिक राजधानीच नाही, तर लाखो लोकांसाठी त्यांची स्वप्नं पूर्ण करणारी एक स्वप्ननगरी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून नागरिक उदरनिर्वाहासाठी इथे येतात आणि अनेकजण कायमचे इथलेच होऊन जातात. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्या शहरात लोकं येतात, तिथे त्या प्रमाणात सोयी-सुविधाही असायलाच हव्यात, हेही तितकेच खरे. पण, या सोयी-सुविधा पुरविण्यासाठी आणि शहराला जागतिक दर्जाचे 'हाय-फाय' शहर बनविण्यासाठी विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा जो काही ऱ्हास सुरू आहे, त्याचे दुष्परिणाम आता दिसायला सुरुवात झाली आहे. गेल्या काही वर्षांत शहराचा वेगवान विकास, बेसुमार काँक्रिटीकरण आणि हवामान बदलामुळे येथील पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षेवर थेट परिणाम होऊ लागला आहे. या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी तीन गंभीर मुद्दे आहेत – झाडे आणि खारफुटीची कत्तल, अति-काँक्रिटीकरण आणि वाढती उष्णता.सध्या मुंबई महानगर प्रदेशात विविध विकासकामे युद्धपातळीवर सुरू आहेत. आधीच मुंबईत जागेची कमतरता असल्यामुळे या विकासकामांच्या मार्गात येणारी झाडे तोडण्याचा सपाटा सुरू झालाय आणि हे कमी म्हणून की काय, तर आता मुंबईचे नैसर्गिक बचाव कवच असलेली खारफुटी हटवण्याचेही प्रयत्न सुरू झाले आहेत.खारफुटी ही काही केवळ झाडे नाहीत. ती मुंबई आणि ठाणे किनारपट्टीसाठी नैसर्गिक सुरक्षा कवच आहेत. भरतीच्या लाटा, चक्रीवादळ, किनारपट्टीची धूप आणि पूर यांपासून शहराचे रक्षण करण्याचे काम खारफुटीची झाडे करतात. सामान्य जंगलाच्या तुलनेत खारफुटी पाचपट अधिक कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात आणि त्यांना वाढण्यासाठी सुमारे १०० वर्षे लागतात. मात्र आता विकासाच्या नावाखाली त्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल सुरू झाली आहे. वर्सोवा-भाईंदर किनारी रस्त्यासाठी तब्बल ४५,६७५ खारफुटीची झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी डहाणू ते आंबेसरी दरम्यान ८४७ खारफुटीची झाडे तोडण्याची परवानगी मागणाऱ्या याचिकेवर नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली.१४ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालय म्हणाले, मुंबईत आधीच ऑक्सिजन कमी आहे. जर हिरवे आवरण असेच कमी होत राहिले, तर तो दिवस दूर नाही जेव्हा लोकांना ऑक्सिजनचे शॉट घेण्यासाठी ऑक्सिजन सिलिंडर घेऊन फिरावे लागेल.भरपाई वनीकरणाच्या ढिसाळपणावरही न्यायालयाने बोट ठेवले. तुम्ही फक्त झाडे लावल्याचे चित्र तयार करता. ती जिवंत आहेत की नाही हे पाहायला तुम्ही मागे वळून पाहत नाही, असे निरीक्षण नोंदवत, खारफुटी जिथे तोडली तिथेच किंवा त्याच जिल्ह्यातील खराब झालेल्या खारफुटीच्या जमिनीवर भरपाई करावी, सोलापूरसारख्या दूरच्या ठिकाणी नव्हे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दुसरा मुद्दा आहे काँक्रिटीकरणाचा. बेसुमार काँक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, त्यामुळे झाडांची मुळे गुदमरून झाडे मरतात. परिणामी, शहराचे तापमान वाढते. तसेच, मुळांना जमिनीत पसरण्यास जागा न मिळाल्याने वृक्ष उन्मळून पडतात. त्यामुळे जीवित व वित्तहानी उद्भवते. मार्च २०२५ मध्ये दाखल झालेल्या सर्वेक्षण अहवालाची दखल घेत २ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला निर्देश दिले, की वृक्षांच्या डी-काँक्रिटायझेशनचे काम केवळ औपचारिकता म्हणून करू नये. वृक्ष कोसळून होणारे अपघात टाळण्यासाठी डी-काँक्रिटायझेशन अनिवार्य आहे, यावर न्यायालयाने भर दिला. याचिकाकर्त्यांनी आरोप केला, की महापालिकेने चुकीची माहिती देऊन न्यायालयात खोटी प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. यावर उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत – कोणत्याही प्रकल्पासाठी संपूर्ण परवानगी एकत्र घ्यावी, तुकड्या-तुकड्याने नव्हे. झाडे तोडण्यापूर्वीच भरपाई वनीकरण करावे. खारफुटींचे जीआयएस मॅपिंग करावे, अशा सूचना न्यायालयाने केल्या आहेत. काँक्रीट, डांबर आणि हिरवळीचा अभाव यामुळे मुंबई अर्बन हीट आयलंड बनत चालली आहे. खारफुटी आणि इतर हिरवळ कमी झाल्याने शहरातील तापमान २ ते ३ अंशांनी वाढले आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. उष्माघात, श्वसनाचे आजार आणि पाण्याची टंचाई वाढू लागली आहे.'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम चालवणाऱ्या नागरिकांचा मुद्दा हाच आहे, की विकास आणि पर्यावरण एकत्रितपणे पुढे नेणे गरजेचे आहे. न्यायालयानेही विकास आणि पर्यावरणीय चिंता यांचे सौहार्दपूर्ण सहअस्तित्व असणे आवश्यक आहे असे म्हटले आहे; परंतु हा समतोल साधताना पर्यावरणाची किंमत चुकवून विकास करता येणार नाही. आता यासाठी मुंबईकर नागरिक म्हणून आपण काय करू शकतो? तर, शाळा, महाविद्यालये आणि सोसायट्यांमध्ये खारफुटींचे महत्त्व आणि उष्णतेचे दुष्परिणाम यावर चर्चासत्रे आयोजित करणे, भरपाई वनीकरणाचे जिओ-टॅगिंग आणि सार्वजनिक वेबसाइटवर माहिती देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी करणे, दर चार महिन्यांनी अद्ययावत माहिती मागणे, आपल्या सोसायटीतील काँक्रीट काढून झाडांसाठी मातीची जागा सोडणे, छतावर आणि बाल्कनीत झाडे लावणे, पाणी आणि विजेचा काटकसरीने वापर करणे, आरटीआय, जनहित याचिका आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे अशा काही गोष्टींमधून आपण काही प्रमाणात का असेना, पण बदल घडवू शकतो.विकासाचा अर्थ फक्त गगनचुंबी इमारती आणि रस्त्यांचे जाळे असा होऊ शकत नाही. मुंबईला वाचवायचे असेल, तर खारफुटी, झाडे आणि स्वच्छ हवा हीच खरी सुरक्षा आहे आणि त्यामुळेच 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही आता केवळ घोषणा राहिली नसून जगण्यासाठीची गरज बनली आहे.शेवटी, उच्च न्यायालयाने बजावल्याप्रमाणे, जर आज आपण थांबलो नाही, तर उद्या आपल्याला खरोखरच ऑक्सिजन सिलिंडर घेऊन जगावे लागेल. वेळ अजूनही गेलेली नाही आणि ती जाण्याची आपण वाट पाहता कामा नये.

# अन्न व औषध प्रशासनाचा दणका!

चींलरळ : सणासुदीचा काळ जवळ येत असताना अन्न व औषध प्रशासनाने (ऋऊ-) ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध तीव्र मोहीम उघडली आहे. ठाणे, मुंबई, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात ऋऊ-ने धडक कारवाई करत अनेक नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि फरसाण उत्पादकांचे परवाने निलंबित केले आहेत. यामध्ये शिळ-दिवा परिसरातील बेकायदा कारखान्यांवर कारवाई करत तब्बल २०.४८ लाखांचा अस्वच्छ आणि घातक माल जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांनी गोपनीय माहितीच्या आधारे ९ सप्टेंबर २०२६ रोजी वास्कर कंपाउंड, शिळ-दिवा रोड, खर्डी गाव परिसरात अचानक छापे टाकले. फरसाण, वेफर्स, चिवडा आणि नमकीन तयार करणाऱ्या ११ आस्थापनांची तपासणी केली असता तेथे अत्यंत निकृष्ट आणि मानवी आरोग्यास हानिकारक प्रकार सुरू असल्याचे निष्पन्न झाले. या कारखान्यांमध्ये बटाटा वेफर्स, फराळी चिवडा, शेव, भाकरवडी, पामोलीन तेल व मैदा यांचा साठा जप्त करण्यात आला. तपासणीदरम्यान खालील गंभीर बाबी उघडकीस आल्या: बहुतांश आस्थापनांकडे अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार आवश्यक वैध परवाना नव्हता.
उत्पादन क्षेत्राची फरशी अतिशय घाणेरडी, चिकट आणि साचलेल्या तेलामुळे दूषित झालेली आढळली.
परिसराबाहेर सांडपाणी साचल्याने तीव्र दुर्गंधी पसरली होती, तसेच झुरळे आणि उंदरांचा मोठा प्रादुर्भाव आढळला. कामगार कोणतेही अप्रोन, हातमोजे किंवा टोपी न घालता अत्यंत अस्वच्छ वातावरणात अन्नपदार्थ बनवत होते.

# मंत्री नितेश राणेंकडून अभ्यास दौरा

मुंबई : सिंधुदुर्गासह संपूर्ण कोकणातील खाड्या, नद्या आणि सागरी संपत्तीचा नियोजनबद्ध वापर करून जलवाहतुकीचे नवे मार्ग विकसित करण्याच्या दृष्टीने राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी गोव्यातील जलवाहतूक व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. चोडना ते रायबंदर या जलमार्गावर प्रवासी तसेच वाहने घेऊन जाणाऱ्या 'रो-रो' फेरीबोटीने प्रवास करून त्यांनी या व्यवस्थेची माहिती घेतली. त्यानंतर उत्तर गोव्यातील प्रका इंजिनिअरिंग शिपयार्डला भेट देऊन जहाजबांधणी आणि जहाजदुरुस्ती उद्योगाच्या कार्यपद्धतीचीही पाहणी केली जलवाहतुकीबरोबरच जहाजबांधणी आणि जहाजदुरुस्ती उद्योगाच्या विस्ताराच्या दृष्टीनेही राणे यांनी शिपयार्डची पाहणी केली. शिपयार्डमधील जहाजबांधणी व दुरुस्तीची कार्यपद्धती, डाय डॉकची सुविधा, त्यासाठी आवश्यक पायाभूत व्यवस्था तसेच या उद्योगातून निर्माण होणाऱ्या रोजगार आणि व्यवसायाच्या संधींची माहिती त्यांनी घेतली. महाराष्ट्राला लाभलेली विस्तीर्ण किनारपट्टी, बंदरे आणि जलवाहतुकीची क्षमता लक्षात घेता राज्यात जहाजबांधणी व जहाजदुरुस्ती उद्योगाच्या विकासाला मोठी संधी असल्याचे राणे यांनी म्हटले

# चहा आरोग्यासाठी किती फायदेशीर ?

चहाला वेळ नसते; पण वेळेला चहा लागतोच! हे वाक्य आपल्या भारतीयांसाठी जीवनमंत्रच आहे. आज जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही जा तुम्हाला त्या प्रांतांमध्ये तिथल्या प्रसिद्ध चहाचा प्रकार चाखायला मिळेल. हे चहाचे प्रकार काही साधेसुधे नाहीत बरं का! मला तर वाटतं की, पूर्वी जसं इराणी हॉटेलांमध्ये मेनू विचारल्यावर ते कसे एका लयीत पदार्थांची नावं घ्यायचे त्याचप्रमाणे, काही वर्षांनी एक चहा द्या, असं सांगितल्यावर कोणता चहा पाहिजे? टी, व्हाईट टी, ब्लॅक टी, ग्रीन टी, येलो टी, वूलॉन्ग टी, रुईबॉस टी ही यादी संपेपर्यंत चहाची तलफ सुद्धा निघून जाईल. हे झाले जागतिक स्तरावर उपलब्ध असलेले चहाचे प्रकार. मात्र, तुम्हाला भारतीयांच्या चहाचे प्रकार ठाऊक आहेत का? ते असे इराण्याच्या त्या पाठांतर केलेल्या लयीत बसणारे नसले तरी प्रत्येक अस्सल चहाप्रेमींच्या मनाला भिडणारे आहेत. हे झाले कृतीमध्ये बदल करून बनवलेले चहाचे प्रकार. मात्र, आपल्याकडे चहा पिण्यासाठी शोधून काढलेले निमित्तसुद्धा कमालीची रंजक आहेत! उदा. सकाळी उठल्याबरोबर काहीतरी पोटात जाण्यासाठी घेतलेला चहा, ऑफिसला जाण्यापूर्वी किंवा स्वयंपाकघरातलं काम संपल्यावर पुन्हा शरीराला तरतरी यावी म्हणून घेतलेला चहा ( 'निदान अर्धा कप तरी घेतोच' अशी मनाला घातलेली समजूत), खोकला झाला की चहा, कामाचा ताण वाढला की चहा, अभ्यास करताना झोप लागू नये म्हणून घेतलेला चहा, बाहेर पाऊस पडतोय म्हणून चहा, पाहुणे आले की चहा, भूक लागली म्हणून नुसती खारी खाण्यापेक्षा चहात खारी बुडवून खावी या निमित्ताने घेतलेला चहा, इ. अशी अनेक 'निष्पाप' कारणं असू शकतात; पण आपल्याला जीवापाड आवडणारा चहा आपल्या आरोग्यासाठी कितपत योग्य आहे?

**चहा म्हणजे काय?** चहा हे जगभरात सर्वांत प्रसिद्ध पेय आहे. जागतिक स्तरावर दोन – तृतीयांश लोक या पेयाचा आस्वाद घेतात. Camellia sinensis (चहाची पानं) या पानांवर प्रक्रिया करून चहाची पावडर बनवली जाते. आणि वरील (टी, व्हाईट टी, ब्लॅक टी, ग्रीन टी इ.) प्रकार हे त्या पानांच्या फर्मेंटेशनच्या प्रमाणीकरणावर अवलंबून असतं.

**दूध-साखरेचा चहा विरुद्ध ब्लॅक/ग्रीन टी:** जगभरात चहावर झालेली बहुतांश संशोधनं ही उराशश्रश्रळरे ळिपशपीळी या वनस्पतींच्या पानांपासून बिनदुधाच्या ब्लॅक किंवा ग्रीन टीवर झालेली आहेत. मात्र भारतात चहा दूध, साखर आणि मसाले घालून चांगला उकळवून प्यायला जातो. ICMR-NIN (N-TION-L INSTITUTE OF NUTRITION) यांच्या अभ्यासातून असं आढळलं आहे की, दूध आणि चहा एकत्र उकळल्याने दुधातील 'केसिन' (लरीशळप) हे प्रथिन चहातील 'कॅटेचिन्स'शी संयोग पावते. त्यामुळे चहामधील नैसर्गिक औषधी घटकांचं प्रमाण आणि ते शरीरात शोषलं जाण्याची क्षमता काही प्रमाणात कमी होते.



**चहाचे फायदे:** "Tea and Health: Studies in Humans' या डॉ. नघमा खान आणि डॉ. हसन मुख्तार, यांनी लिहिलेल्या या शोधनिबंधात संशोधकांनी चहाच्या रासायनिक घटकांवर आणि मानवी शरीरावर होणाऱ्या त्याच्या सकारात्मक परिणामांवर प्रकाश टाकला आहे: अँटीऑक्सिडंट्सचा साठा : पॉलिफेनॉल्स हे वनस्पतींमधलं नैसर्गिक पौष्टिक संयुग असतं आणि कॅटेचिन्ससुद्धा पॉलिफेनॉल्सप्रमाणेच अँटीऑक्सिडंट आहे. हे दोन्ही घटक आपल्या शरीरातल्या पेशींना सुरक्षित ठेवतात. ग्रीन टी आणि ब्लॅक टीमध्ये पॉलिफेनॉल्सचं प्रमाण बऱ्यापैकी असतं. ग्रीन टीमध्ये EGCG (Epigallocatechin-3-gallate) हा प्रमुख कॅटेचिन असतो; तर ब्लॅक टीमध्ये ऑक्सिडेशनच्या प्रक्रियेमुळे तयार होणारे थियाफ्लॅव्हिन्स (ढहशरषश्रर्रींळपी) आणि थियारुबिजिन (ढहशर्रीीलळसळपी) असतात. कर्करोग प्रतिबंधक गुणधर्म: संशोधनानुसार, चहामधील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील पेशींचे 'ऑक्सिडेटिव्ह डॅमेज'पासून संरक्षण करतात. अनेक क्लिनिकल आणि एपिडिमियोलॉजिकल अभ्यासांत असं आढळून आलं आहे की, चहाचं नियमित सेवन त्वचेचा कर्करोग (डीरिीं लशश्रश्र लरीलळपेर), फुप्फुसाचा कर्करोग, प्रोस्टेट आणि स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास सहायक ठरू शकतं. हृदय व रक्तवाहिन्यांचं आरोग्य : चहामधील फ्लेवोनॉइड्स रक्तवाहिन्यांचं कार्य सुधारतात. त्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये चरबी साचण्याची प्रक्रिया (-therosclerosis) रोखण्यास आणि कोरोनरी हृदयरोग (Coronary Heart Disease) टाळण्यास मदत होते. चयापचय आणि मधुमेह नियंत्रण : चहा शरीराच्या रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास (-ntidiabetic effects) आणि वृद्धत्वविरोधी (-nti-aging) प्रक्रियेस हातभार लावतो.

**चहाचे दुष्परिणाम:**

जेवणानंतर लगेच चहा का पिऊ नये? चहामध्ये टॅनिन्स (Tannins) मोठ्या प्रमाणात असतात. हे टॅनिन्स आपण खाल्लेल्या अन्नातील लोहाशी (विशेषतः वनस्पतीजन्य / शाकाहारी नॉन-हीम लोहाशी) संयोग पावतात, ज्यामुळे आतड्यांमध्ये लोह शोषले जात नाही. सकाळी उठल्या उठल्या जर तुम्ही फक्त चहा प्यायलात, तर चहातील टॅनिन्स पोटाच्या आतील आवरणाला उत्तेजित करतात. त्यामुळे चहा प्यायल्यानंतर सतत घशाशी येणं, मळमळणं पोटात दुखायला लागणं हे प्रकार होतात. थोडक्यात रिकाम्या पोटी चहा घेतल्यास सिडिटी वाढते, ज्यामुळे हे सगळे त्रास सुरू होतात. हो, चहामध्ये कॅफिन असतं. कॅफिन म्हणजे असं द्रव्य जे मज्जासंस्थेला उत्तेजित करतं, त्यामुळे चहा किंवा कॉफीसारखं पेय घेतल्यास तुमची काम करण्याची ऊर्जा वाढते आणि झोप उडून जाते. शरीरात तयार होणारं मेलॅटोनिन हे संप्रेरक झोप येण्यासाठी अत्यंत आवश्यक असतं. त्यामुळे जर तुम्ही झोपेच्या वेळेदरम्यान कॅफिनयुक्त पेय प्यायलात, तर तुम्हाला झोप लागत नाही; पण कामाच्या वेळी जेव्हा कॅफिनचा परिणाम घटतो तेव्हा डुलकी लागते. अस्वस्थता आणि व्यसन: कॅफिनसारखं द्रव्य जे तुमच्या मज्जासंस्थेला उत्तेजित करतं, त्याचं जर तुम्ही प्रमाणापलीकडे सेवन करीत असाल, तर चिडचिड होणं, हात-पाय थरथरणं, हृदयाचे ठोके अचानक वाढणं, बीपी अनियंत्रित होणं असे अपायकारक परिणाम होऊ शकतात. चक्कर येणं: जास्त प्रमाणात कॅफिनचं सेवन केल्यानं (किंवा कॅफिन सोडल्यानंतरच्या विड्रॉलमुळे) रक्तदाबावर परिणाम होऊन व्यक्तीला चक्कर किंवा हलकेपणा जाणवू शकतो. गरोदरपणातील धोके: अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिशियन्स अँड गायनॅकॉलॉजिस्ट्स (-उजऋ) नुसार गरोदरपणात दररोज २०० मिग्रॅपेक्षा कमी कॅफिन सुरक्षित मानलं जातं. प्रमाणाबाहेर चहा प्यायल्यास गर्भाच्या वाढीवर परिणाम होणं किंवा जन्माच्या वेळी वजन कमी असण्याचा धोका संभवतो. वारंवार लघवीला होणं: 'चहा प्यायल्यानं शरीरात तरतरी आली, मग आता पाण्याची काय गरज,' असा विचार जर तुम्ही करत असाल, तर तो तुमच्या शरीरासाठी घातक ठरू शकतो. अति लघवी होत असल्यानं शरीरातलं पाणी कमी होतं, ज्यामुळे डिहायड्रेशनचा त्रास सुरू होतो. त्यामुळे पाणी पिणं हे चहा पिण्यापेक्षा अधिक महत्त्वाचं आहे. **चहाचं सेवन किती प्रमाणात करावं?** चहा पिण्याचे शरीरावर एवढे सारे दुष्परिणाम होणार असतील, तर चहा सोडून देणंच योग्य पर्याय आहे का? चहा सोडून देणं हा काही या समस्येवरचा उपाय नाही. मात्र, शरीराची काहीही हानी होऊ नये यासाठी चहा पिण्यावर नियंत्रण ठेवण्याजोग्या बाबी खालीलप्रमाणे: मर्यादित प्रमाण : जर सिडिटी किंवा निद्रानाशाचा त्रास होत असेल, तर दिवसातून दोन-तीन लहान कपांपेक्षा ( दोन वेळा मगभर चहा घेऊन चहाचं प्रमाण कमी करणार असाल, तर ते काही उपयोगाचं नाही) जास्त चहा पिऊ नये. रिकाम्या पोटी चहा टाळा : सकाळी उठल्या उठल्या शरीराला तरतरी यावी म्हणून नुसता चहा पिणं टाळा. चहासोबत निदान दोन-तीन खारी, टोस्ट किंवा सरळ नाश्ता करा म्हणजे सिडिटीचा त्रास होणार नाही. जेवण आणि चहामध्ये अंतर : जेवणातील लोह शरीराला योग्य प्रकारे मिळावं म्हणून चहा आणि जेवणाच्या वेळांमधलं अंतर पाळा. संध्याकाळी ७ वाजता ऑफिसवरून थकून आलो आणि चहा पिण्याची इच्छा झाली म्हणून ७ वाजता चहा घेऊन ८ वाजता जेवायला बसू नका. त्यामुळे शरीराला जेवणातून मिळणारे लोह मिळणार नाही. ६-७ वाजताचा चहा टाळा : संध्याकाळी ६-७ वाजता चहा पिणं टाळा. या वेळेत जर तुम्ही चहा किंवा कोणतंही कॅफिनयुक्त पेय प्यायलात, तर झोपेचं चक्र बिघडेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाचा नियोजित आराखडा उद्या जाहीर होणार; म्हाडा आणि विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने विशेष सादरीकरण

मुंबई : मुंबईच्या ऐतिहासिक आणि सामाजिक वारसा लाभलेल्या कामाठीपुरा परिसराचा चेहरामोहरा बदलणाऱ्या बहुचर्चित 'कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाचा' नियोजित आराखडा अखेर समोर येत आहे. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे आणि कामाठीपुरा विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाच्या मास्टर प्लॅनचे विशेष सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. उद्या, शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता अखिल पद्मशाली समाज, भावना बाग, कामाठीपुरा, सहावी गल्ली, मुंबई येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. प्रकल्पाची व्याप्ती आणि पार्श्वभूमी महाराष्ट्र शासनाचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी समूह पुनर्विकास प्रकल्प असून, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत (चइठ्ठइ) ऊउझठ २०३४ मधील विनियम ३३(९) अंतर्गत राबवला जात आहे. यासाठी म्हाडाला 'नोडल एजन्सी' तसेच 'विशेष नियोजन प्राधिकरणाचा' (ड्झ–) दर्जा देण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मे. भागीरथी हाउसिंग प्रा. लि. आणि माथी डेव्हलपर्स प्रा. लि. यांची 'उेर्पीीीलींळेप ऊशींशश्रेशिपीं –सशपलू' (उऊ–) म्हणून नियुक्ती झाली आहे. दिग्गज वारसा असलेल्या या परिसरातील जुन्या, जीर्ण व धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करून




येथील रहिवाशांना सुरक्षित, आधुनिक आणि सुसज्ज निवासव्यवस्था उपलब्ध करून देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. अंदाजे ३४ एकर क्षेत्र आणि ८ हजारांहून अधिक कुटुंबे प्रभावित दि. १२ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार या भागात सेस व नॉन–सेस इमारतींच्या एकात्मिक पुनर्विकासाची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत: एकूण क्षेत्र: सुमारे ३४ एकर इमारतींची संख्या: सुमारे ९४३ उपकरप्राप्त (सेस) आणि ३४९ नॉन–सेस इमारती एकूण हितसंबधित घटक: ८,००० हून अधिक रहिवासी व भाडेकरू घटकनिहाय आकडेवारी: सुमारे ६,६२५ निवासी भाडेकरू, १,३७६ व्यावसायिक भाडेकरू आणि सुमारे ८०० जमीनमालक या प्रक्रियेशी जोडलेले आहेत. सादरीकरणाचा मुख्य उद्देश कामाठीपुरा विकास समितीच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात प्रकल्पाची संपूर्ण संकल्पना, व्याप्ती, पुनर्वसनाचे नियोजन, नागरिकांना मिळणाऱ्या नागरी व पायाभूत सुविधा, पर्यावरणपूरक उपाययोजना आणि भविष्यातील विकासाचा आराखडा मांडला जाणार आहे. स्थानिक नागरिक, भाडेकरू, जमीनमालक आणि सर्व संबंधित घटकांना हा नियोजित आराखडा थेट समजून घेता यावा, तसेच त्यांच्या सक्रिय सहभागातून पुनर्विकासाची ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख करता यावी, यासाठी या विशेष सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे.

# तब्बल २० लाख बाप्पा परदेशात रवाना

पेण : गणेशोत्सवाचा २०२६) सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे आणि या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील 'मूर्तींचे माहेरघर' मानल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील गणेशमूर्तींना देश–विदेशातून प्रचंड मागणी मिळाली आहे. यंदाच्या हंगामात पेणमधून सुमारे ७० लाखांपेक्षा जास्त गणेशमूर्तींची विक्री झाली आहे. विशेष म्हणजे, यातील तब्बल १५ ते २० लाख मूर्ती थेट परदेशांतील बाजारपेठेत पाठवण्यात आल्या आहेत. कच्च्या मालाचे भाव वाढल्यामुळे यंदा गणेशमूर्तींच्या दरात १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली होती. मात्र, असे असूनही जगभरातील गणेशभक्तांच्या उत्साहात कोणतीही कमतरता दिसून आली नाही आणि मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स नोंदवण्यात आल्या. स्थानिक मूर्तिकार व विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा कापडाचा वापर करून तयार केलेल्या विशेष आकर्षक गणेशमूर्तींना ग्राहकांची सर्वाधिक पसंती मिळाली.

पेणमध्ये तयार होणाऱ्या गणेशमूर्ती केवळ महाराष्ट्रात किंवा भारतातच नाही, तर अमेरिका, संयुक्त अरब अमिराती (ण–ए) आणि वेस्ट इंडिज यांसारख्या विविध देशांमध्ये पाठवल्या जातात. परदेशातील निर्यातीची तयारी दरवर्षी जानेवारी महिन्यापासूनच सुरू होते आणि ती जूनपर्यंत चालते. त्यानंतर स्थानिक आणि देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यावर भर दिला जातो. अलिकडच्या वर्षांत थायलंड, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, मलेशिया, इंडोनेशिया, मॉरिशस अशा अनेक देशांमध्ये पेणच्या मूर्तींची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अनिवासी भारतीयांनी (छख्ख) केलेल्या ऑनलाइन बुकिंगच्या आधारे यंदा सुमारे ५ लाख शाडूच्या आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (झेझ) मूर्ती पेणमधील कार्यशाळांमधून परदेशात रवाना करण्यात आल्या. समुद्रमार्गे वाहतूक आणि ६ फुटांपर्यंतच्या मूर्तींना मागणी १४ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवासाठी या सर्व मूर्ती 'जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी' (गछ्झ–) या बंदरामार्फत मार्च ते मे या कालावधीत जहाजांद्वारे विविध देशांत पाठवण्यात आल्या. पूर्वी परदेशातून प्रामुख्याने लहान आकाराच्या मूर्ती मागवल्या जायच्या; परंतु यंदा या ट्रेंडमध्ये मोठा बदल झाला असून १० इंचांपासून ते थेट ६ फुटांपर्यंतच्या मोठ्या मूर्तींची मागणी नोंदवण्यात आली. परदेशात राहणाऱ्या मराठी आणि भारतीय नागरिकांमुळे पेणच्या गणेशमूर्तींची लोकप्रियता जागतिक स्तरावर सातत्याने वाढत आहे. आखाती देशांतील तणावामुळे निर्यातीत काही काळ अडथळा यंदाच्या निर्यातीदरम्यान काही आंतरराष्ट्रीय आव्हानांचाही सामना करावा लागला. आखाती देशांमधील (र्त्रीश्रष ठशसळेप) युद्धजन्य व तणावाच्या परिस्थितीमुळे गछ्झ–बंदरामधून होणाऱ्या जहाजांच्या वाहतुकीला काही काळ विलंब झाला होता. त्यामुळे मूर्ती वेळेवर पोहोचतील का, अशी चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, काही दिवसांतच परिस्थिती निवळल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत झाली आणि लाखो गणेशमूर्ती सुरक्षितपणे परदेशांतील भक्तांपर्यंत पोहोचल्या.

# ठाण्यात अवजड वाहनांना बंदी; वाहतूक पोलिसांकडून नियमावली जाहीर



गणेशोत्सव २०२६ दरम्यान विसर्जन मिरवणुका निर्विघ्न पार पडाव्यात आणि शहरातील वाहतूक कोंडी टाळावी, यासाठी ठाणे शहर पोलिसांनी मोठा निर्णय घेतला आहे. विसर्जनाच्या मुख्य दिवसांमध्ये ठाणे शहरात अवजड आणि अतिधोकादायक वाहनांच्या प्रवेशावर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी याबाबतचे अधिकृत आदेश जारी केले आहेत. प्रमुख विसर्जनाच्या दिवशी शहरात प्रवेश बंद ठाणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड दिवस, पाच दिवस, सहाव्या दिवशी होणारे गौरी–गणपती विसर्जन, सात दिवस आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी शहरात मोठ्या प्रमाणावर भाविक रस्त्यावर उतरतात. मिरवणुकांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी विशिष्ट मार्गांवरून अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. या तारखांना लागू राहतील वाहतूक निर्बंध वाहतूक पोलिसांनी जाहीर केल्यानुसार, १५, १८, १९, २० आणि २५ सप्टेंबर २०२६ या प्रमुख विसर्जन दिवसांवर हे निर्बंध लागू राहतील. प्रत्येक विसर्जनाच्या दिवशी गरजेनुसार आणि वेळेनुसार वाहतुकीचे नियम बदलण्यात आले आहेत. पोलिसांनी निश्चित केलेल्या काही विशिष्ट मार्गांवरून अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे रोखली जाईल. इतर दिवशी रात्रीच्या वेळी निर्बंध प्रमुख विसर्जनाच्या दिवसांव्यतिरिक्त, गणेशोत्सवाच्या इतर दिवशीही अवजड वाहनांच्या वाहतुकीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. या काळात रात्रीच्या वेळी अवजड वाहनांच्या हालचालींवर बंदी असेल, तर केवळ प्रशासनाने ठरवून दिलेल्या विशिष्ट वेळेतच त्यांना प्रवासाची परवानगी दिली जाईल. प्रवाशांनी आणि वाहनचालकांनी सहकार्य करण्याचे आवाहन गणेशोत्सवाच्या काळात लाखो भाविक विसर्जन मिरवणुकांमध्ये सहभागी होतात. अशा वेळी अवजड वाहनांमुळे अपघात किंवा वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्व वाहनचालकांनी आणि वाहतूकदारांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि पोलिसांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहन ठाणे पोलीस प्रशासनाने केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना 'स्टेट्समनशिप अवॉर्ड';

लंडन : महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेले नेतृत्व आणि सार्वजनिक सेवेतील योगदानाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लंडनमधील हाऊस ऑफ कॉमन्स येथे 'स्टेट्समनशिप अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. वर्ल्ड लीडरशिप फोरमच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र–भारत–यूके डायलॉग' या आंतरराष्ट्रीय परिषदेत बॅरोनीस गीता नारगुंड, लॉर्ड रेमिरेंजर आणि लॉर्ड रवेल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी ब्रिटिश उद्योजक आणि गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात 'ग्रीन कॅपिटल' आणि आधुनिक तंत्रज्ञानासह गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राकडे मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि मजबूत पायाभूत सुविधा आहेत. या क्षमतांची सांगड ब्रिटनच्या तंत्रज्ञान, डिझाइन आणि हरित भांडवलाशी घालून पर्यावरणपूरक विकासाची नवी भागीदारी उभारूया, असे ते म्हणाले. फडणवीसांसोबत 'टीम' म्हणून काम

पान ४ वरून पान ४ वरून पान ४ वरून

## शेतकऱ्यांच्या पीक

पंचनामे करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. पूर्वीचे ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी पीकविमा योजनेअंतर्गत पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी महत्त्वाची मागणीही नितिन जेथलिया यांनी कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे केली. तसेच शासनाच्या निकषानुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व पीक नुकसानभरपाई, पीकविमा लाभ, आवश्यक कर्जसवलत व कर्ज पुनर्गठनाचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. शासनाकडून सकारात्मक कार्यवाहीची अपेक्षा यावेळी नितिन जेथलिया यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी, पावसातील दीर्घ खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, संभाव्य उत्पादनातील घट आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती देऊन शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी भूमिका नितिन जेथलिया यांनी यावेळी व्यक्त केली. परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आज मोठ्या संकटातून जात आहेत. पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली नाही तर त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवेल. त्यामुळे तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई, शासकीय नुकसानभरपाई आणि पूर्वीचे ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे, असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन परतूर विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय व आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## परतूर उपविभागात

पत्रांची पूर्तता, अर्ज भरण्याची प्रत्यक्ष पद्धत, आवश्यक पात्रता निकष आणि शासन निर्णयातील तरतुदींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच पात्र नागरिकांकडून आवश्यक संचिका (फाईल) व अर्ज जागेवरच स्वीकारण्याची सोय प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहे. या विशेष जनजागृती मोहिमेमुळे तळागाळातील पात्र नागरिकांपर्यंत अचूक माहिती पोहोचून अर्जांच्या संख्येत वाढ होईल आणि प्रमाणपत्रांची प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद होईल, असा विश्वास उपविभागीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरांना उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. गायकवाड यांनी केले आहे. असे असेल शिबिरांचे वेळापत्रक:

दि. १० सप्टेंबर २०२६:– आष्टी (महसूल मंडळ कार्यालय, आष्टी) व तळणी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) ११ सप्टें. – श्रीष्टी (ग्रामपंचायत कार्यालय, श्रीष्टी) व मंठा (तहसील कार्यालय, मंठा) १२ सप्टें. – वाटूर (ग्रामपंचायत कार्यालय, वाटूर) व पांगरी गोसावी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) १५ सप्टें – सातोना खु. (महसूल मंडळ कार्यालय), कोकाटे हदगाव (ग्रामपंचायत कार्यालय) व ढोकसाळ (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) १६ सप्टें – परतूर (तहसील कार्यालय, परतूर) व माळतोंडी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) १७ सप्टें – जयपूर (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय)

## जालना येथे अल्पसंख्यांक

प्रयत्नशील आहे, या सामाजिक कामाला यश देखील येत आहे, समाजाची प्रगती, देशाची प्रगती यासाठी चचछ्ञ्च चे जनजागृती अभियान जालना या शहरात दि. १४ रोजी येत आहे, यनिमित्त डिसीए क्लासेस, दर्गा रोड, एमएसईबी कार्यालयासमोर, दर्गा चौक जुना जालना येथे सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत अल्पसंख्यांक विकास योजना मार्गदर्शन व चर्चासत्र चचछ्ञ्च जालना ज़िल्हा शाखेच्या वतीने आयोजित केले आहे, अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी हा कार्यक्रम खूप दिशादर्शक ठरेल, म्हणून या अल्पसंख्यांक विकास मार्गदर्शनाचा लाभ घेणेसाठी अल्पसंख्यांक समाज बांधव, संस्था, ट्रस्टी, सामाजिक नेते यांनी कार्यक्रमांस उपस्थित राहावे असे आवाहन चचछ्ञ्च जिल्हा अध्यक्ष शेख चाँद पी.जे., कार्याध्यक्ष वसीम खान यांनी केले आहे.

## बालकामगाराची सुटका;

बालक व त्याची सावत्र आई शेतावर राहत होते. दरम्यान, बालकाच्या आजीने त्याचा ताबा मागितला असता, संबंधित शेतमालकाने बालकाच्या वडिलांनी घेतलेल्या पैशांची परतफेड झाल्याशिवाय बालकाला सोडणार नसल्याचे सांगितल्याची माहिती पडताळणीत समोर आली. तसेच बालकाकडून शेतीचे काम करून घेतले जात असल्याचेही निदर्शनास आले. माहितीची गोपनीय पद्धतीने पडताळणी केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित शेतमालकाविरुद्ध बालकामगार व बंधमजुरी प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. बालकाची सुटका करून त्याला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. त्यानंतर त्याची शासकीय मुलांच्या बालगृहात दाखल करण्यात आली आहे. बालकाच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने त्याला त्याच्या मूळ गावी, हासुंड, खांडवा (मध्यप्रदेश) येथे पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## दुष्काळाचे सावट तरीही

खरीप हंगामातील पिकांना आता पावसाची नितांत आवश्यकता असून शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. उपलब्ध पाण्यावर पिके जगविण्याची धडपड सुरू असून बळीराजा आता पूर्णपणे निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहे. 'निदान या महिन्यात तरी दमदार पाऊस पडावा, शिवारातील पिकांना जीवदान मिळावे आणि शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे,' अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. दुष्काळाच्या संकटातही आपल्या कृषी संस्कृतीची परंपरा जपत आंबा येथील ग्रामस्थांनी सर्जा–राजाचा पोळा उत्साहात साजरा केला.

## दुष्काळाच्या सावटात तळणीत '

लाभली होती. पोळ्याच्या मैदानावर पावसाचीच चर्चा यावर्षी अनेक शेतकऱ्यांनी उत्साहाने नव्या बैलांची खरेदी केली होती. परंतु, गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे उभ्या पिकांना मोठा फटका बसत आहे. पावसाअभावी शेतकरी कमालीचा धास्तावला असून, पोळा मैदानावरही यंदा केवळ पावसाची आणि दुष्काळाचीच चर्चा रंगली होती. मात्र, निसर्गाच्या या अवकृपेनंतरही शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी अत्यंत शांततेत व श्रद्धेने सणाचा आनंद घेतला. मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याप्रसंगी सरपंच गौतम सदावर्ते, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे, माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धवराव पवार, सुधाकर सरकटे, माणिकराव सरकटे, शिवाजीराव सरकटे, अरुण सरकटे, विष्णुपंत सरकटे, सचिन पाटील, बाळू पाटील, दारासिंग चव्हाण, दिगंबर कापकर यांच्यासह गावातील प्रमुख नागरिक, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मिनी ट्रॅक्टर योजने

असे समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे. योजनेची पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज भरण्याची सविस्तर प्रक्रिया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र स्वयंसहाय्यता बचत गटांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करून त्याची प्रत कार्यालयात जमा करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनडॉ. अनिता राठोड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालनायांनी केले आहे.

## बीआरएसपी च्या जालना

त्यांच्या कार्यक्षेत्राची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळी पक्षाचे मराठवाडा सचिव मिलिंद बोर्डे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पक्षाची विचारधारा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच बहुजन समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करावे, पक्षाचे संघटन गावपातळीपर्यंत मजबूत करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस मराठवाडा सचिव मिलिंद बोर्डे, ज्येष्ठ नेते प्रकाश वाघ यांच्यासह सुमित सपकाळ, स्वप्नील सावंत, हिवाळे, रविराज वाडेकर, विशाल डोळसे, किरण मस्के आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा प्रभारी काशिनाथ दादा मगरे यांनी केले, तर नवनियुक्त जिल्हाध्यक्ष कैलास रत्नपारखे यांनी उपस्थितांचे आभार मानले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मॉडर्न बाप ...

आकृती साचे बंद
कडक करारी बाप
कोरडा गंभीर उग्र
मनात तया संताप

घरात सदैव दुर्लक्ष
कामाचाभलाव्याप
दरारा आणे शहारा
ओढला बंदूक चाप

बदलू लागे प्रतिमा
बनतोयं डॅडा पॉप
ममा पेक्षा जवळचा
बाबूश भलता टॉप

आई पेक्षा बाबाकडे
लहानगा टाके झाप
मॉमची शिस्तकडक
डॅडकडे सगळे माफ

कुछभी मांगोमिलेगा
उघडे डॅडीज् शॉप
रे समजू उमजू घेतो
होता कधीही ऑफ

आई लुडबुड करते
उगा डोक्याला ताप
पॉप माझा लाडाचा
खपवून घेतो प्रताप

नाळअदृश्य नात्यास
आईडी असे वा बाप
दोघांचे सदैव शोभते
छत्र डोक्यावर टॉप

**– हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996

### योग क्षेमम् ..
### (योग दिन)

चित्ती वृत्ति निरोधः
योगाचेतत्व मौलीक
समाधान देई संपूर्ण
सुखा पेक्षा भौतिक

चित्त वृत्ती प्रसन्नता
सम तोल मानसिक
निरोगी गात्र असता
स्वस्थता रे शारिरीक

ऋषि मुनींची देणगी
स्पर्श तया भावनिक
निरंतर ताजे सर्वथैव
जरीशास्त्र पौराणिक

न दिलासाक्षणभंगुर
सुखेसोडावी ऐहीक
योगऔषध व्याधीस
बालकडू हे बौद्धिक

मर्यादित दृष्टी नको
चातुर्य व्यावसायिक
जात धर्म रंग विसरे
प्रार्थना सामुदायिक

योगःचित्तवृत्तिनिरोधः
फलप्राप्ती हो दैहिक
युज् हे समाधि सूत्र
योग जुळवे सोयरिक

योगविद्या दिलीजगा
धन्य रे शास्त्र जैविक
साजरा करे सुखानंदे
योगदिवस रे वैश्विक

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
9730306996

### डॅडी ..

काळानुरूप सारी
बदलत आहे पिढी
पूर्वीचे आबा बाबा
झालेत पप्पा डॅडी

रुळ खटखट बदले
सटासट धावे गाडी
मवाळ झाले वडील
अन् मुले धीट थोडी

ममापेक्षापॉपसोबत
चालते जास्त खोडी
अंगा खांद्यावरती गं
खुशाल मारावी उडी

डोळे वटारता ममडी
पॉपस्शी लाडी गोडी
डेडाच्याताटात जेवा
अधीक वाढली गोडी

धमालमस्ती बाबांशी
कशी करे छेडाछेडी
धाक उगा हवा कुणा
कोपऱ्यात बसे छडी

खेळा रंगला परिवार
डॅड लाडका सवंगडी
होतो घोडा उंट हत्ती
घालतो कधी लंगडी

स्नेह प्रेमाने गच्च भरे
अमोल नात्यांची पेढी
अधिक वाढे ओलावा
रे बदलली जरी पिढी

**– हेमंत मुसरीफ पुणे.**

### योगा क्लास..

धडाक्यात चालवतो
योगासनांचा क्लास
जाहिरात गाजलेली
चरबी होईलं खलास

तंदुरुस्त करु सकला
आमचा एकचं ध्यास
दोन महिन्यात अर्धा
होईलं पोटाचा व्यास

टायगरश्रॉफ बनवेन
मी घेरवाल्या बाबास
ढोल पिटे मोठ मोठे
आता चिंता पुरे बास

वाढाया लागली गर्दी
बसू लागला विश्वास
योगासनं झाला धंदा
चाले मजेत झकास

व्याधी अनंतजडली
नैराश्य करे सहवास
आत्मा होई बंदिस्त
शरीर बने कारावास

फास्ट फूडचे दुकान
बाजूलाउघडले खास
क्लासमध्ये दर्वळला
बटाटेवड्यांचा वास

बारीक होत चालला
आमचा योगा क्लास
फास्ट फूड घेर वाढे
चाले त्याचा विकास

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
9730306996

### घटस्फोट ..

एकनिष्ठ होतो जिथे
रे पक्षकसा सोडावा
प्रियआपला माणूस
आपणातून तोडावा

सगळेचं नवीन जिथे
कसा घरोबा जोडावा
सय जुन्याजोड्याची
कशाशोभेल खडावा

जिगरी म्हणे ज्याला
रे तोच दोस्त नडावा
पहाडासमान सेवक
धाय मोकलू रडावा

रे अस्थिरखुर्चीसाठी
विश्वास असा उडावा
पायाचा दगड झालो
तोचि बंगला पाडावा

घट स्पोट स्पोट करी
कुणाचेहाती धाडावा
परत एक व्हावे वाटे
बुरखे टरार फाडावा

महाभारत हे कशास
आप्त आप्त भिडावा
येणार नाही रे पुन्हा
गेलेला परत गोडावा

अपेक्षा जनसामान्या
रे समर्थ नेता घडावा
जो कायमचं अभेद्य
नवीन पक्ष काढावा

–हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

